SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR-416 004, MAHARASHTRA
Vidyanagar, Kolhapur. Phone 0231-2609400 Lead College Section 0231-2609087
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर–416 004 महाराष्ट्र
Estd. 1962 अग्रणी महाविद्यालय विभाग 0231– 2609087 email id- lead.college@unishivaji.ac.in
NAAC 'A' Grade Website : www.unishivaji.ac.in

संदर्भ क. शिवाजी वि./अग्रणी महा. योजना / No 0 0 2 9 8 दिनांक : 0 9 FEB 2021

प्रति,
मा. अधिविभागप्रमुख,
सर्व पदव्युत्तर अधिविभाग,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय : अग्रणी महाविद्यालय योजनेतंर्गत व्याख्यान आयोजित करणेबाबत...

महोदय / महोदया,

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, दिनांक 29 जानेवारी, 2021 रोजी मा. कुलगुरूसो यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित अग्रणी महाविद्यालय शिखर समितीच्या बैठकीमध्ये झालेल्या निर्णयानुसार विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयामध्ये पदवी अभ्यासक्रमाकरीता शेवटच्या वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता ऑनलाईन कार्यक्रम घेण्याच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत निश्चित करण्यात आले आहे.

अ) विद्यापीठ परिसरातील सर्व अधिविभागांनी विद्यापीठाशी संलग्नित सर्व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाकरीता शेवटच्या वर्षामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांकरीता विविध शैक्षणिक संधी, रोजगार संधी, **Career Counseling** इत्यादीच्या अनुषंगाने ऑनलाईन मार्गदर्शनपर किमान दोन व्याख्याने आयोजित करावीत.

ब) सदर ऑनलाईन व्याख्यानाच्या अनुषंगाने व्याख्याते, विषय, दिनांक व वेळ याबाबतच्या माहितीच्या परिपत्रकाचा मसुदा अधिविभागांनी तयार करून सदरचा मसुदा सर्व संलग्नीत महाविद्यालयांना व विद्यार्थ्यांना पाठविण्याच्या अनुषंगाने परीक्षा विभागाकडे (आयटी सेल) पाठवून द्यावा. परीक्षा विभागाने सर्व संलग्नित महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमाकरीता शेवटच्या वर्षामध्ये प्रवेशित असणा–या सर्व विद्यार्थ्यांना ईमेलद्वारे सदरचे परिपत्रक पाठवून द्यावे.

क) सदरच्या ऑनलाईन व्याख्यानाच्या अनुषंगाने व्याख्याते म्हणून येणा–या महनीय व्यक्तींना विद्यापीठ नियमानुसार मानधन आदा करावे सदरचे मानधन आदा करण्यासाठी येणारा खर्च अग्रणी महाविद्यालय योजने अंतर्गत विद्यापीठाकडे जमा होणा–या १० टक्के रक्कमेतून करण्यात यावा. (अंदापत्रकीय शिर्षक **E.3 P.37**)

आपला विश्वासू,

प्रा. (डॉ.) व्ही. डी. नांदवडेकर
कुलसचिव

प्रत माहितीसाठी,

1. मा. प्राचार्य / संचालक, सर्व संलग्नित महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
2. मा. संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

D:\data\backup\Documents\Lead College\Apex\circuler.docx